जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in



❖ संस्थापक ❖

**स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया**

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.
मो. : ८२६२०५६४८०, ☎ : ०२० - २४२१५५८३
मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१
संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया
: सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५२ वे ❖ अंक ७ वा ❖ मार्च २०२१ ❖ वीर संवत २५४७ ❖ विक्रम संवत २०७७

या अंकात पान नं.

● जैन समाजातील भूषावह व्यक्तिमत्व व धडाडीचे युवा नेतृत्व श्री. विजयजी भंडारी १५
● कव्हर तपशील २३
● भारत सरकार राष्ट्रीय जनगणना २०२१ – जैन समाज जागृती अभियान २५
● अनेकान्त २९
● मिथ्यात्व के त्याग से होती आत्म-शुध्दी ३१
● सुखी जीवन की चाबियाँ : दिर्घ-दर्शिता ३७
● प्राकृत ग्रंथ परिचय लेखमाला ४१
● कडवे प्रवचन ४३
● स्पृहणीय ज्येष्ठोत्सव – श्रेष्ठोत्सव ४५
● जागृत विचार ४६
● हास्य जागृति ४७
● ऐसी हुई जब गुरु कृपा : कैंची नहीं सुई बणणों ५७
● तिचं अस्तित्व ५९
● रत्न संदेश ६३
● कॉन्फिडेंस ऑन – स्ट्रेस गॉन ६५
● विश्वास ही जीवन है ६६
● खाद्य पदार्थ को अखबार में लपेटकर न खरिदें ६६
● मोह और अज्ञान ६७
● नवकार आर्ट फौंडेशन – पुणे ६८
● कॅम्प एज्युकेशन सोसायटी – नामकरण ६९
● जिनेंद्र सोशल फौंडेशन, पुणे ७०
● गच्छाधिपती श्री दौलतसागर सूरीश्वरजी म.सा, पुणे – आगम शिरोमणी ७१
● गौतम लब्धि फौंडेशन – पुणे ७३
● चिचोंडी सुंदर गांव पुरस्कार ७३
● गौतम लब्धि की शाखा खोलने के लिए मार्गदर्शक सूत्र ७४
● गौतम लब्धि फौंडेशन – पिंपरी, चिंचवड ७५
● श्री. प्रफुल्लजी कोठारी, पुणे – अॅवॉर्ड ७५
● श्री. राजकुमारजी लोढा, पुणे – Ph.D. ७९
● प्रा. योगेश बाफना – Ph.D. ७९
● खुश रहने की Master Key ८०

● सौ. सुलभा भंडारी, पुणे –
६६ व्या वर्षी – ५०१ सुर्यनमस्कार ८१
● श्री. धवल शाह, जयराज ग्रुप, पुणे ८१
● युवाचार्य साध्वी श्री. शुभम्जी
एक परिचय ८३
● सुर्यदत्ता जीवन गौरव पुरस्कार – पुणे ८४
● डायग्नोपिन डायग्नोस्टिक सेंटर, औंध ८५
● श्री. मिठालालजी जैन, पुणे ८५
● सिलाई वर्ल्ड, श्री. दादा गुजर – पुणे ८६
● महावीर इंटरनॅशनल, अहमदनगर ८६
● ऐसा आचरण कदापी स्वीकार्य नहीं ८८
● जयती जैनम् साधना तीर्थ – भिवरी ८९
● दु:ख दिये, दु:ख होय ९२
● चिचोंडी – वर्षीतप पारणे ९३
● जैन जीवन शैली – प्रतियोगिता ९३
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या



**जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर** ❖ एका वर्षात तीन मोठ्या अंकासहित

| पंचवार्षिक | रु. २२०० | त्रिवार्षिक | रु. १३५० | वार्षिक | रु. ५०० |
|---|---|---|---|---|---|

या अंकाची किंमत ५० रुपये.

● www.jainjagruti.in
● www.facebook.com/jainjagrutimagazine


## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

● वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.

● आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. ● 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/मनिऑर्डर/ड्राफ्ट/AT PAR चेक/ पुणे चेकने / **RTGS / SBI Online / Jain Jagruti Website** इत्यादी द्वारा पाठवावी.

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**
**Bank : STATE BANK OF INDIA** **Branch : Market Yard, Pune 37.**
**Current A/c No. : 10521020146** **IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२-१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia



टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

टिप : जैन जागृति अंकात प्रकाशित लेख, बातम्या, जाहिरातीचे सर्वाधिकार सुरक्षीत आहेत.

## कव्हर तपशील - मार्च २०२१

❖ **गच्छाधिपती श्री दौलतसागर सूरिश्वरजी म.सा.**

प.पू. गच्छाधिपती आचार्य भगवंत श्री दौलतसागरसूरीश्वरजी म.सा. यांना आनंद दरबार, दत्तनगर येथे पूना जैन सकल संघाच्या वतीने ''आगम शिरोमणी'' पद देऊन गौरव करण्यात आले.

या वेळी आचार्य श्री नंदिवर्धनसागर सूरीश्वरजी म.सा., आचार्य प.पू श्री हर्षसागरसूरीश्वरजी म.सा., श्री रमणीकमुनिजी म.सा., श्री विरागसागरजी म.सा., श्री अमीतगुनाश्रीजी म.सा. आदी साधू-साध्वी उपस्थित होते. माजी राज्यमंत्री उल्हास पवार, जितोचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. विजयजी भंडारी, श्री. चकोरजी गांधी, प्रा. अशोकजी पगारिया, श्री. सुहासजी शहा, श्री. इंदरजी जैन, श्री. बाळासाहेब धोका, श्री. दिलीपजी संचेती इ.च्या हस्ते ''आगम शिरोमणी'' ही पदवी देण्यात आली. (बातमी पान नं. ७१)

❖ **गौतम लब्धि फौंडेशन, पुणे**

गौतम लब्धि फौंडेशन पुणे तर्फे ५ फेब्रुवारी २०२१ रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे संदिप पंचवाडकर प्रस्तुत शो मस्ट गो ऑन या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमास क्रसना डायग्नोस्टिक यांनी मोठी देणगी दिल्याबद्दल श्री. राजेंद्रजी मुथा व पल्लवी जैन यांचा सन्मान श्री. सतीशजी सुराणा, श्री. सुभाषजी मुथा, श्री. अनिलजी नहार, श्री. किरणजी बोरा, ॲड नितीनजी संकलेचा, श्री. सुरेशजी गांधी, श्री. दिलीपजी कटारिया इ. मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.
(बातमी पान नं. ७३)

❖ **सुर्यदत्ता जीवन गौरव पुरस्कार**

सुर्यदत्ता एज्युकेशन फौंडेशनच्या २३ व्या स्थापना दिवसा निमित्ताने सुर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे 'सुर्यदत्ता जीवन गौरव पुरस्कार ' व सुर्यदत्ता राष्ट्रीय पुरस्कार' राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांना गौरविण्यात आले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, आचार्य डॉ. लोकेश मुनिजी, अनूप जलोटा, रजा मुराद, सुर्यदत्ताचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजयजी चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, कार्यकारी विकास अधिकारी सिध्दांत चोरडिया आदी उपस्थित होते. (बातमी पान नं. ८४)

❖ **कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे**

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूल व ज्युनियर कॉलेज या शाळेचे नामकरण 'डॉ. सायरस पुनावाला हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज' तसेच कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सायरस पुनावाला स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे नामकरण केंद्रिय पर्यावरण, वन आणि अवजड उद्योगमंत्री मा. श्री. प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री मा. डॉ. सायरस पुनावाला होते. कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा. श्री. वालचंदजी संचेती, मा. डॉ. शाम राजोरे, मा. श्री. अण्णासाहेब भोसले इ. मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. (बातमी पान नं. ६९)

❖ **गौतम लब्धि फौंडेशन - पिंपरी, चिंचवड**

गौतम लब्धि फौंडेशन पिंपरी-चिंचवड तर्फे १८ फेब्रुवारी २०२१ रोजी चिंचवड येथे श्री. संदिप पंचवाडकर यांचा शो मस्ट गो ऑन या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमाचे प्रायोजन क्रसना डायग्नोस्टिकचे श्री. राजेंद्रजी मुथा यांनी केले. यावेळी राजेंद्रजी मुथा यांना मानपत्र देताना आपत्ती व विकास फंड अध्यक्ष श्री. राजेंद्रजी मुनोत, श्री. नयनजी भंडारी, श्री. सचिनजी धोका,

श्री. मनोजजी सोळंकी, श्री. किशोरजी फिरोदिया, श्री. हेमंतजी गुगळे, श्री. आनंदजी डुंगरवाल, राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अनिलजी नहार, राष्ट्रीय शिक्षा प्रमुख श्री. किरणजी बोरा. (बातमी पान नं. ७५)

- **जिनेंद्र सोशल फौंडेशन, पुणे**

महाराष्ट्र राज्यातील जैन श्वेतांबर मुर्तिपुजक गुजराती समाजाचे संघटन व सक्षमीकरण करण्याच्या हेतुने राज्यपातळीवर कार्य करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या 'जिनेंद्र सोशल फौंडेशन' या संस्थेचा शुभारंभ नुकताच पुण्यात ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचा लोगो, वेबसाईट व ॲपचे अनावरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जयराज ग्रुपचे चेअरमन श्री. राजेश शहा, पराग मिल्क फुडस् लि.चे चेअरमन श्री. देवेंद्र शहा तसेच सुयोग ग्रुप ऑफ कंपनीज्चे चेअरमन भरत शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप मेहता, संचालक रोहीत झवेरी, अभिषेक शहा व संतोष दोशी इ. मान्यवर उपस्थित होते. (बातमी पान नं. ७०)

- **श्री. प्रफुल्लजी कोठारी, पुणे – ॲवॉर्ड**

वडगाव शेरी, पुणे येथील प्रसिध्द बिल्डर्स, डायग्नोपिन डायग्नोस्टीक सेंटरचे संचालक व सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर श्री. प्रफुल्लजी कोठारी यांना लोकमत अचीवर्स, पुणे हा ॲवॉर्ड खासदार श्री. गिरीषजी बापट, मंत्री दत्तोत्रयजी भरणे, आर. डी. देशपांडे, पुणे व्यापारी अध्यक्ष श्री. फत्तेचंदजी रांका, अभिनेत्री मंदिरा बेदी यांच्या हस्ते देण्यात आला. (बातमी पान नं. ७५)

- **श्री. राजकुमारजी लोढा, पुणे – Ph.D**

पुणे येथील धार्मिक, सामाजिक कार्यात अग्रेसर श्री राजकुमारजी कांतीलालजी लोढा यांना एल्फस राज्य सरकार विश्व विद्यालय दिल्ली यांच्याकडून मा. राज्यपाल न्यायमूर्ती नवरंगलाल तिब्रेवाल, न्यायमूर्ती डॉक्टर राजेश टंडन, उपकुलगुरु डॉक्टर अंजु भंडारी आणि हेल्प इंडिया चे अध्यक्ष डॉक्टर जगदीश परिक व ग्रेट खली यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी डॉक्टरेट पदवीचे प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. (बातमी पान नं. ७९)

- **जैन समाज गौरव – श्री. विजयजी भंडारी**

पुणे येथील जैन समाज गौरव, जितोचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व सर्व समावेशक व्यक्तिमत्व श्री. विजयजी भंडारी यांची मुलाखत या अंकात पान नं. १५ वर दिली आहे.

- **सिलाई वर्ल्ड, श्री. दादा गुजर – पुणे**

सिलाई वर्ल्डचे संस्थापक श्री. दादा गुजर यांच्या वाढदिवसा निमित्त सिलाई वर्ल्ड तर्फे १७ ते २३ जानेवारी हा 'सिलाई सोशल विक' साजरा करण्यात आला. दि. २२ जानेवारी २०२१ रोजी जिद्द पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संत साहित्याचे अभ्यासक विद्यावाचस्पती डॉ. रामचंद्र देखणे हे उपस्थित होते. सोबत श्री. दादा गुजर व सौ. सुजाता गुजर इ.
(बातमी पान नं. ८६)

- **जैन चित्रकार, चित्राचे प्रदर्शन – पुणे**

पुण्यातील बालगंधर्व कलादालन येथे जैन चित्रकार चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले होते. २९ जानेवारी २०२१ रोजी पुणे येथील प्रसिध्द रांका ज्वेलर्सचे संस्थापक, जितोचे चेअरमन तसेच श्वेतांबर जैन मंदिर दादावाडी, पुणेचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाशजी रांका यांच्या हस्ते व प्रसिध्द चित्रकार सुनिलजी हंबीर, लाहोटी सर, महिला अध्यक्षा विमलजी बाफना व पारख फूडस्चे प्रकाशजी पारख तसेच नगरसेवक मा. श्री. प्रवीणजी चोरबेले या मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. सोबत श्री. मनसुखजी छाजेड, श्री. शशिकांतजी कोठारी इ. मान्यवर. (बातमी पान नं. ६८) •

# भारत सरकार राष्ट्रीय जनगणना - २०२१
# डिजिटल जनगणना * जैन बांधव जागृती अभियान
# धर्माच्या कॉलम मध्ये फक्त ''जैन'' लिहा.

भारत सरकार दर १० वर्षांनी राष्ट्रीय जनगणना करीत असते. मागील जनगणना २०११ साली झाली व आता जनगणना २०२१ साली होणार आहे. यावर्षी जनगणना पेपरलेस असल्यामुळे टॅबलेट वर माहिती भरुन घेतली जाणार आहे. जनगणला लवकरच सुरुवात होणार आहे.

२०११ च्या या जनगणनेत जैन धर्मियांची जनगणना फक्त ४५ लाख दाखवण्यात आली. पण वास्तव मध्ये जैन धर्मियांची लोकसंख्या या पेक्षा बरीच जास्त आहे. जाणकार व गुरुदेवांच्या मते जैन धर्मियांची संख्या २ ते ३ कोटी आहे.

जैन धर्मियांची लोकसंख्या जनगणनेत कमी येणे याला पुढील कारणे सांगता येतील.

- जनगणना प्रतिनीधी जेव्हा आपल्या घरी येतो त्यावेळी बरेच लोक धर्माच्या कॉलमच्या पुढे श्वेतांबर जैन, दिगंबर जैन, स्थानवासी जैन, हिंदू जैन, जैन हिंदू, हिंदू, ओसवाल जैन, पोरवाल जैन इ. असे लिहितांना दिसत आहेत. असे लिहिणे चुकीचे आहे. धर्माच्या कॉलमपुढे फक्त 'जैन' लिहा. जैन धर्म हा स्वतंत्र व अती प्राचीन धर्म आहे. जैन धर्म कोणत्याही धर्माची शाखा किंवा उपशाखा नाही.
- जनगणना प्रतिनीधी जेंव्हा फॉर्म भरतो त्यावेळेस न विचारता धर्माच्या कॉलम मध्ये हिंदू लिहितो. धर्माच्या कॉलम मध्ये काय लिहावे हे विचारले जात नाही.
- जनगणना प्रतिनीधी जेव्हा घरी येतो, त्यावेळेस जास्त करुन महिला वर्ग किंवा मुले घरात असतात. त्यांना धर्माच्या कॉलममध्ये जैन लिहावे याची जागृती नसल्यामुळे धर्माच्या कॉलममध्ये चूकिची नोंद केली जाते.
- फॉर्म भरुन झाल्यावर संपूर्ण फॉर्म नीट वाचून धर्माच्या कॉलम मध्ये जैन लिहिले आहे का हे चेक करावे.
- जनगणना फॉर्म मध्ये मातृभाषेच्या कॉलम बरोबर अजून कोणती भाषा जाणता असा कॉलम आहे. त्यात आपण 'प्राकृत' पण लिहा. आपले बरेच ग्रंथ प्राकृत भाषेत आहेत. आपण रोज प्रार्थना म्हणतो. त्यातील बरेच श्लोक प्राकृत भाषेत आहेत. जाणणाऱ्या भाषेत ''प्राकृत''चा उल्लेख जरुर करा.

**केंद्र सरकार व राज्य सरकार राष्ट्रीय जनगणनाला आधार मानून आपल्या विविध योजना ठरविल्या जातात. तसेच विविध राजकीय पक्षही या जनगणनेच्या आधारेच आपले उमेदवार निवड व विविध योजना अमलात आणतात. यासाठी जैनाची खरी लोकसंख्या राष्ट्रीय जनगणनेत येणे आवश्यक व महत्वाचे आहे.**

**जैन समाजातील नेते, आचार्य भगवंत व साधू-साध्वी यांनी या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन या संदर्भात समाज बांधवाना जागृत करुन धर्माच्या कॉलममध्ये फक्त 'जैन' लिहा असा प्रचार करावा.**

**जनगणनाचा फॉर्म भरुन झाल्यावर त्याचा मोबाईलवर फोटो काढून ठेवावा.**

**प्रेषक : संजय चोरडिया**
**संपादक - जैन जागृति**